P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट** दिनांक - ०९/०८/२०२२

## पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या वतीने, स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव अंतर्गत हर घर तिरंगा हा उपक्रम विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन साजरा :

राष्ट्रध्वजाची उभारणी स्वयंस्फूर्तीने करण्याबाबत नागरिकांना आवाहन.

भारतीय स्वांतत्र्याला ७५ वे वर्षे पुर्ण होत असल्याच्या पार्श्वभुमीवर, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या वतीने पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांच्या मनात स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृति तेवत रहाव्यात, स्वातंत्र्य संग्रामातील ज्ञात आणी अज्ञात नायक/ क्रांतीकारक तसेच स्वांतत्र्य सांग्रमात घडलेल्या विविध घटना यांचे स्मरण व्हावे, तसेच स्वातंत्र्यासाठी चेतावलेले स्फुल्लिंग कायम तेवत रहावे व देशभक्तीची जाज्वल्य भावना कायमस्वरुपी जनमानसात राहावी याकरिता देशाच्या देदीप्यमान इतीहासाचे अभिमानपुर्वक संस्मरण करण्यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सव निमीत्त “हर घर तिरंगा” अभियानांतर्गत पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय अंतर्गत निगडी पोलीस ठाणे, वाकड पोलीस ठाणे पिंपरी पोलीस ठाणे तसेच तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे हद्दीतील विविध ठिकाणी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

निगडी पोलीस ठाणे हद्दीतील ज्ञानप्रबोधनी स्कुल, प्राधिकारण येथील सुमारे ४०० विद्यार्थी व विद्यार्थीनी यांना हर घर तिरंगा पथनाट्चे, स्वातंत्र्यलढा, देशभक्ती, इत्यादी विषयांवर माहिती देवून त्यांना सदर उपक्रम शाळेमध्ये व आपल्या घरी, शेजारी राबविण्याबाबत प्रोत्साहीत करण्यात आले.

राज्य राखीव पोलीस दलाच्या पोलीस बॅंडपथकाने निगडी येथील भक्ती शक्ती चौक, पिंपरी येथ्रील आंबेडकर चौक, वाकड येथील डांगे चौक तसेच तळेगाव दाभाडे येथील मुख्य चौकामध्ये देशभक्तीपर संगीत वाजवून सदर उपक्रमाबाबत शहरातील प्रत्येक नागरिकांच्या घरावर तसेच शासकीय/ निमशासकीय/ खाजगी/ अस्थापना/ सहकारी संस्था/ शैक्षनिक संस्था यांच्या इमारतीवर राष्ट्रध्वजाची उभारणी स्वयंस्फूर्तीने करण्याबाबत नागरिकांना आवाहन करून जनजागृती करून देण्यात आली.

सदर जनजागृती उपक्रम मा. श्री. अंकुश शिंदे पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. श्री. संजय शिंदे अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, श्री. काकासाहेब डोळे पोलीस उप-आयुक्त मुख्यालय, पिंपरी चिंचवड, श्री. मंचक इप्पर पोलीस उप-आयुक्त परि-१, तसचे श्री. आनंद भोईटे पोलीस उप-आयुक्त परि-२ यांचे मार्गदर्शनाखीली राबविण्यात आला.

**(रावसाहेब जाधव)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा
जनसंपर्क अधिकारी पिंपरी चिंचवड